आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ जून २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर रवाना

- विद्यार्थ्यांसाठी एसटी महामंडळाची उद्यापासून एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम सुरू

- उत्तराखंडमध्ये हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या अपघातात सात जणांचा मृत्यू, मृतांमध्ये यवतमाळच्या तिघांचा समावेश

**आणि**

- कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले.

लार्नाका आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाल्यानंतर, अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिड्स हे प्रधानमंत्री मोदी यांचं स्वागत करतील. त्यानंतर तिथले नेते, तसंच भारतीय आणि सायप्रस उद्योजकांसोबत व्यावसायिक गोलमेज बैठकीसाठी प्रधानमंत्री लेमेसोसला रवाना होतील. त्यानंतर अनौपचारिक जेवण होईल.

व्यापार, गुंतवणूक, शिक्षण, डिजिटल सहकार्य आणि प्रादेशिक सुरक्षा यासारख्या प्रमुख मुद्यांवर राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडौलिड्स यांच्याशी प्रधानमंत्री उद्या द्विपक्षीय चर्चा करतील. व्यापक जागतिक आणि प्रादेशिक मुद्यांवरही दोन्ही नेते विचारांची देवाणघेवाण करणार आहेत.

दरम्यान, कॅनडा इथं होणाऱ्या 'जी-७ शिखर परिषदे'त जागतिक समस्यांवर आणि विशेषत: जगाच्या दक्षिणेकडच्या देशांच्या समस्यांवर विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी माहिती प्रधानमंत्र्यांनी दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी दिली होती.

**<><><><>**

नवीकरणीय उर्जेद्वारे २०३० या वर्षापर्यंत ५०० गिगावॅट ऊर्जा निर्मिती करायचं लक्ष्य भारतासमोर आहे, असं प्रतिपादन केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी केलं. ते बंगळुरु इथं जागतिक पवन ऊर्जा दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. भारताच्या नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रानं लक्षणीय प्रगती केली आहे. पवन ऊर्जेची क्षमता गेल्या वर्षीच्या तुलनेत साडेदहा टक्क्यांनी वाढून ५१ पूर्णांक ५ दशांश गिगावॅटवर गेली आहे तर सौरउर्जेची क्षमतासुद्धा गेल्या वर्षीच्या तुलनेत ३१ पूर्णांक ४९ टक्क्यांनी वाढून ११० पूर्णांक ८३ गिगावॅटपर्यंत पोचली आहे असं त्यांनी सांगितलं. भारताच्या नवीकरणाय ऊर्जा क्षेत्राचा वेगानं विकास होत आहे. आणि त्याद्वारे भारतानं उज्ज्वल आणि अधिक शाश्वत भविष्याकडे वाटचाल सुरु केली आहे, असा विश्वास प्रल्हाद जोशी यांनी यावेळी व्यक्त केला.

<><><>

जम्मू-काश्मीरच्या संस्कृतीशी नाळ जोडणाऱ्या प्रादेशिक स्तरावरच्या कार्यक्रमांच्या सादरीकरणावर भर द्यायची आवश्यकता केंद्रीय माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी व्यक्त केली आहे. दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या श्रीनगर केंद्रांद्वारे सादर केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा, तसंच वृत्त प्रसारणाचा आढावा घेताना ते बोलत होते. जम्मू काश्मीरमध्ये सार्वजनिक वृत्त प्रसारणातून केवळ माहिती नव्हे, तर प्रेरणा पोहोचवायची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. स्थानिक भाषा, वाढती वृत्तसेवा याला प्रोत्साहन देत एक मजबूत आणि सर्वसमावेशक माध्यम निर्मितीतून या भागातल्या विविधतेचं प्रतिबिंब दाखवण्याचा आपला उद्देश असायला हवा, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><>

उत्तर प्रदेशात कुशीनगर इथं 'इस्रो', अर्थात, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं रॉकेट प्रक्षेपण चाचणी यशस्वीपणे पार पाडली. उत्तर प्रदेशातून झालेलं हे पहिलंच प्रक्षेपण असल्यानं या चाचणीला ऐतिहासिक महत्त्व होतं. 'थ्रस्ट टेक इंडिया लिमिलेड' या कंपनीसोबत 'इस्रो'नं केलेल्या या चाचणी दरम्यानरॉकेट प्रक्षेपण चाचणी दरम्यान, प्रक्षेपित केलेलं अंतराळयान १ पूर्णांक १ दशांश किमी उंचीवर गेलं. त्यानंतर, एक लहान उपग्रह बाहेर आला आणि तो ५ मीटर खाली येताच, त्याचं पॅराशूट सक्रिय झालं आणि उपग्रह

जमिनीवर ४०० मीटरच्या आत आला. १५ किलो वजनाचं रॉकेटही पॅराशूटच्या मदतीनं सुरक्षितपणे उतरलं.

येत्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये विद्यार्थ्यांकडून अंतराळात सोडल्या जाणाऱ्या ९०० उपग्रहांच्या प्रक्षेपणासाठी आजच्या या चाचणीमुळे पाया घातला गेला आहे, अशी माहिती थ्रस्ट टेक इंडियाचे संचालक विनोद कुमार यांनी दिली आहे. देशभरातल्या मुलांमध्ये अंतराळ तंत्रज्ञानाबद्दल रस निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम आखल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

एसटी बसने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उद्यापासून एसटी महामंडळ "एसटी पास थेट तुमच्या शाळेत" ही विशेष मोहीम राबवणार आहे. या मोहिमेतून विद्यार्थ्यांना एसटीचे पास त्यांच्या शिक्षणसंस्थांमधून वितरीत केले जाणार आहेत. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला तसे निर्देश दिले आहेत. शासनाकडून विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत तसंच पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेंतर्गत विद्यार्थीनींना दिले जाणारे मोफत प्रवासाचे पास त्यांना एसटी आगारातून घ्यावे लागत होते. परंतु आता शिक्षण संस्थानी दिलेल्या माहितीप्रमाणे हे पास आता एसटी महामंडळाकडून थेट संस्थांकडे येतील आणि विद्यार्थ्यांना आपापल्या संस्थांमधून ते घेता येतील. त्यासाठी सर्व शाळा महाविद्यालयांनी आपल्या संस्थेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवावी अशी सूचना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी शिक्षणसंस्थांना केली आहे.

<><><><>

राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचं महाबळेश्वर इथलं विभागीय गहू गेरवा संशोधन केंद्र अद्ययावत करण्याबरोबरच राज्यातल्या शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचं प्रतिपादन कृषिमंत्री तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु माणिकराव कोकाटे यांनी केलं आहे. महाबळेश्वर इथं नव्यानं उभारण्यात येत असलेल्या अतिथीगृहाचं भूमिपूजन आज कृषिमंत्र्यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. महाबळेश्वर इथल्या संशोधन केंद्रामध्ये गव्हाच्या रोगावर संशोधन सुरू

असून आता स्ट्रॉबेरीच्या संशोधनाला देखील मान्यता मिळाली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><>

आषाढी एकादशी सोहळा येत्या सहा जुलै रोजी होत असून २६ जून ते दहा जुलै असा यात्रा कालावधी असेल. श्री विठ्ठल- रुक्मिणीच्या दर्शनासाठी सर्व मानाच्या आणि अन्य पालख्यांचं त्यांच्या नियोजित तिथीप्रमाणं पंढरपूरकडे प्रयाण होत आहे. त्या अनुषंगानं एकंदर व्यवस्थेबाबत राज्य सरकारतर्फे विशेष आढावा घेण्यात येत आहे. यंदाच्या आषाढी वारीसाठी मानाच्या दहा पालख्यांसोबतच्या अकराशेहून जास्त दिंड्यांना प्रती दिंडी वीस हजार रुपये याप्रमाणे अनुदान देण्याचा शासन निर्णयही काल जारी झाला आहे.

<><><>

उत्तराखंडमध्ये केदारनाथ परिसरात असलेल्या गौरीकुंड खार्क या डोंगराळ भागात आज सकाळी खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर झाडाला धडकून झालेल्या अपघातात सहा यात्रेकरू आणि पायलटसह सात जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये यवतमाळच्या वणी इथल्या जयस्वाल कुटुंबातल्या तीन जणांचा समावेश आहे.

हे हेलिकॉप्टर केदारनाथहून गुप्तकाशीला जात होतं. घटनेची माहिती मिळताच, बचाव पथकं घटनास्थळी रवाना झाली आणि मदत आणि बचाव कार्याला सुरूवात झआली. ‘एसडीआरएफ’, अर्थात, ‘राज्य आपत्ती निवारण दला’नं दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त हेलिकॉप्टर पूर्णपणे जळलं असून सर्व मृतदेह बाहेर काढले आहेत. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

‘विमान अपघात तपास विभाग’ या अपघाताची चौकशी करणार आहे. धामी यांनी हेलिकॉप्टर सेवा दोन दिवसांसाठी स्थगित करायचे आदेश दिले आहेत. या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त करून प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राध्यान्य असल्याचं त्यांनी सांगितलं. तसंच चौकशीनंतर हेलिकॉप्टर सेवा पुन्हा सुरू केली जाईल, असं सांगितलं. ‘डीजीसीए’ अर्थात, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून आहे. यापुढे कोणती कारवाई करायची, याचा आढावा घेतला जात आहे.

<><><>

उत्तर प्रदेशच्या अमेठी परिसरात आज सकाळी मृतदेह घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकेला झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. तर, अन्य एक जण गंभीर जखमी झाला. अपघातग्रस्त रुग्णवाहिकेचा समोरचा भाग पूर्णत: उद्ध्वस्त झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या संगमनेर तालुक्यात कोल्हार घोटी महामार्गावर स्लीपर कोच बस आणि ट्रकची टक्कर होऊन झालेल्या अपघातात तिघे जण जागी ठार झाले तर नऊ जण जखमी झाले आहेत. जखमींवर संगमनेर शहरातल्या खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**<><><><>**

राज्यात गेल्या चोवीस तासापासून विविध जिल्ह्यांत मुसळधार पाऊस झाला आहे. **रायगड** जिल्ह्यात काल रात्रीपासून जोरदार पाऊस पडत असून महाड, पोलादपूर, माणगाव, गोरेगाव आणि म्हसळा या भागात पावसाचा जोर अधिक आहे. गोरेगाव परिसरात काल ढगफुटी सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यानं या भागाला पावसानं झोडपून काढलं आहे. जिल्ह्यातल्या आंबा, कुंडलिका सावित्री, पाताळगंगा या नद्या दुथडी भरुन वाहू लागल्या आहेत. मुसळधार पावसामुळं मुंबई गोवा महामार्गावरची  वाहतूक विस्कळीत झाली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर कायम आहे. मुसळधार पावसामुळं अनेक ठिकाणी पडझडीच्या घटना घडल्या आहेत. काही ठिकाणी रस्त्यावर दगड-माती आल्याच्या घटना घडल्या असून त्या काढण्याचं काम सुरू आहे.

**नाशिक** जिल्ह्यात दोन दिवसांपासून वादळी पावसाची हजेरी कायम असून काल त्र्यंबकेश्वर तालुक्यातल्या भागओहोळ इथं वीज पडून एका तरुणाचा मृत्यू झाला. येवला आणि नांदगाव तालुक्यात रात्री विजांच्या कडकडाटासह पावसानं हजेरी लावली. यामुळं शेतांना तळ्याचं स्वरुप प्राप्त झालं आहे. येवला शहरातल्या व्यापारी संकुलातल्या काही दुकानांमध्ये पाणी शिरून नुकसान झालं आहे. घरांची पडझड, शेतातील सौर ऊर्जा प्रकल्प आणि पशूधनाचं देखील नुकसान झालं आहे. पुढच्या दोन दिवसांसाठी नाशिक जिल्ह्याला हवामान विभागानं मुसळधार पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

दरम्यान, कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट तसंच जोरदार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><>//**